भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४६२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २२/०६/२०१७

**१) अल्पवयीन मुलीवर अत्याचार करुन तिची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद .:–**

दिनांक ११/०६/२०१७ चे २३.०० ते २३.३० वा. दर. यातील फिर्यादी हिला आरोपीने लग्नाचे आमीष दाखवुन ती अल्पवयीन असल्याचे माहीत असुन सुध्दा डिसेंबर २०१६ चे १४.३० वा. पासुन तीचे घरी तिच्यावर वांरवार अत्याचार केले व दिनांक ११/०६/२०१७ ला २३.०० ते २३.३० वा. दर. तिचे सोबत अत्याचार करुन तिची फसवणुक केल्याने अल्पवयीन फिर्यादी वय १७ वर्ष, ११ महिने हिचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३७६(२)(एन)४१७ भांदवि. सहकलम ४,६ बाल लैगिंक अत्याचर प्रतिबंधक कायदा २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. पुसाटे पो. स्टे. लाखांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) संगनमत करुन क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन पाण्याचे कॅनने डोक्यावर व लाथा बुक्यांनी मारुन जखमी केल्याने .गुन्हा नोंद :–**

दिनांक २१/०६/२०१७ चे ९.३० ते १०.०० वा. दर. यातील फिर्यादी संतोष विजेन्द्रनाथ पांडे वय २४ वर्ष, रा. देव सुकडी जि. नागपुर ह. मु. सुभाष वार्ड मोहाडी हा आपले मोटार सायकल ने पाण्याची खाली कॅन घेवुन जात असतांना यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस थांबवुन मोटार सायकल चे नुकसान भरपाई पैशाचे विचारुन भांडण करुन फिर्यादीस आरोपी क्र. १ ने फिर्यादीचे खाली पाण्याचे कॅनने डोक्यावर मारुन जखमी केले व आरोपी क्र. २ व ३ यांनी काठीने व लाथा बुक्यांनी मारुन जखमी केल्याने फिर्यादी जखमीचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३२४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेपुंजे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन जनावर प्राण्याची कत्तल करुन मास अवैद्यरित्या विक्री करतांनी साहित्यासह मिळुन आल्याने गुन्हा नोंद .:–**

दिनांक २१/०६/२०१७ चे ११.३० वा. पुर्वी. यातील आरोपीतांनी संगनमत करुन मो. शाहरुख सफीर शेख यांचे घराचे वरच्या मजल्यावर जनावर प्राण्याची कत्तल करुन त्याचे मास अवैद्यरित्या विक्री करीत असतांनी त्यांचे पासुन ५ किलो मास, तराजु काटा, व वजन २ किलो, १ किलो ५०० ग्रॅम, चे वजन काटा, १ लोखंडी सतुर, १ ॲलुमीनीयमचा घमेला एकुण किंमती १६५०/–रु. चा माल मिळुन आल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२९,३४ भांदवि. सहकलम९(अ),५(क)प्रा.सं.अधी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चाबुकस्वार पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवुन फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद .:–**

दिनांक ०६/०६/२०१७ चे १२.३० वा. पुर्वी. यातील आरोपी यास फिर्यादीची मुलगी वय १७ वर्ष, रा. परसोडी ही अल्पवयीन असल्याचे माहीत असुन सुध्दा कायदेशीर रखवालीतुन लग्नाचे आमिष दाखवुन फुस लावुन पळवुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३६३ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. वानखेडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

५) अवैध देशी दारु अडयावर धाडी . :–

दिनांक २१/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, साकोली, पवनी व अडयाळ येथे अवैध देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन २१ लिटर हातभट्टी दारु, किंमती १८००/–रु, ५ लिटर ४०० मिली लिटर देशी दारु किंमती १५००/–रु. असा एकुण किंमती ३,३००/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २१/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनांवरती २१ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९३ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९९२३०७७०२२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीत